# ११. मिनूचा जलप्रवास

एक होती नदी. तिच्यात होते खूप खूप पाणी. निळे निळे, थंडगार व स्वच्छ! इतके स्वच्छ की वरून पाहिले, की तळाची वाळू दिसायची. गोल गोल गोटे दिसायचे अन् सुळसुळ् पोहणारे छोटे मासेही दिसायचे. माशांच्या समूहात राहायची मिनू मासळी ! मिनू होती इवलीशी. अगदी तुमच्या हाताच्या छोट्या बोटाएवढी. रुपेरी कल्ल्यांची! इतर मासे तिचे खूप खूप लाड करायचे. तिला क्षणभरही नजरेआड होऊ द्यायचे नाहीत; पण मिनूला नदीच्या त्या खोलगट भागात राहायचा कंटाळा आला होता.

ती आईला विचारायची, ''आई, एवढं पाणी रोज कुठं जातं?'' आई म्हणायची, ''मिनू, पुढे मोठा समुद्र आहे त्यात जातं! ''आई, समुद्र केवढा असतो?'' मिनू विचारी. ''मला माहीत नाही बाळ.'' आई म्हणायची.

मिनू मधूनमधून विचार करायची, खरेच केवढा असेल बरे समुद्र? रोज एवढे पाणी त्यात जमते म्हणजे खूपच मोठा असणार आणि खूप खूप खोलही! असे केले तर! तो समुद्रच बघून आलो तर! आनंदाने तिने टुणकन उडीच मारली.



एक दिवस मुसळधार पाऊस पडू लागला. जमिनीवरून पाण्याचे लोंढे वाहायला लागले. नदीचे पाणी गढुळले. मासे बावरून एकमेकांना शोधू लागले; पण कोणीच कोणाला दिसेना. पाणी वेगाने वाहत होते. या गोंधळात मिनूची व आईची चुकामूक झाली व पाण्याबरोबर मिनूही गिरक्या घेत निघाली. खूप वेळ ती अशीच पोहत होती. मिनूने हळूच तोंड उघडले. थू थू! सगळे खारट पाणी! अय्या! म्हणजे समुद्र, समुद्र म्हणतात तो आला की! बापरे, केवढा लांबपर्यंत पसरलेला आहे. नजरसुद्धा पोहोचत नाही इतक्या लांब! चला, थोडीशी चक्कर मारून परत जावे झाले! मिनू हळूहळू पुढे निघाली. पाण्यात एका बाजूला लांबपर्यंत खडकांच्या रांगा होत्या. त्यांतील एका खडकावर फुलेच फुले होती. नदीच्या पाण्यावर तरंगायची तशी! मिनूला गंमत वाटली. ती हळूहळू पुढे निघाली. लाल, गुलाबी, अंजिरी फुले. किती छान छान रंग होते त्यांचे!

इतक्यात तिची एका विचित्र माशाशी टक्कर झाली. त्याचे तोंड घोड्यासारखे होते व पोटाला पिशवी होती. त्यात छोटी छोटी पिल्ले बसलेली होती. मिनूला क्षणभर हसूच आले.

''कोण तुम्ही?'' तिने विचारले; पण तो पिवळा मासा काहीच न बोलता हळूहळू पुढे गेला.

एवढ्यात तळाकडून आवाज आला. ''त्याचं नाव घोडमासा, समुद्रघोडा!'' आवाजाच्या रोखाने मिनूने पाहिले. तळाशी एक मोठे कासव बसले होते. नदीत असते त्यापेक्षा कितीतरी मोठे! मिनू लाटांच्या पायऱ्या उतरत त्याच्याजवळ पोहोचली व म्हणाली,

''कासवदादा, तुम्ही इकडं कधी आलात?''



''मी तर इथंच राहतो'' ते म्हणाले.

''नाहीच मुळी. आमच्या नदीतही एक छान छान कासवदादा आहेत.''

'' ते वेगळे. मी समुद्रात राहतो! पण तू इकडं का आलीस? इथं तर पावला - पावलांवर संकटं उभी आहेत. बघितलंस किती चित्रविचित्र मासे फिरतायत इकडून तिकडे! तो आठ हात असलेला अष्टभुज मासा. तो कसा उलटा चालतोय, बघितलंस का? पाण्याच्या चुळा भरत हळूहळू मागं सरकतो. आपल्या आठ हातांनी मासे, खेकडे पकडून खातो. पाण्यात उतरणारी माणसंसुद्धा त्याला घाबरतात बरं का!''

''पण कासवदादा, इथं तर तळाला नदीसारखेच शंख-शिंपले पडलेले आहेत!''

''पण नदीतल्या शंख-शिंपल्यांत काय असते? इथं या दोन शिंपल्यांच्या पेटीत एक किडा बसलेला असतो बरं का! त्याला चालायचं असलं, की आपले पाय फटीतून बाहेर काढून तो हळूहळू चालतो. हा अगदी मांसाचा गोळा असतो गोळा. या शिंपल्यात चुकून एखादा वाळूचा कण गेला, की तो याच्या अंगाला टोचायला लागतो. मग तो आपल्या अंगातून पातळ रस काढून त्यावर गुंडाळतो. तरी बोचणं काही संपतच नाही. हा आपला तसाच गुंडाळत राहतो. मग त्यातून छानदार मोती तयार होतो. इथं तळापर्यंत कधी कधी माणसं येतात. शिंपले उचलून घेऊन जातात.''

इतक्यात त्यांच्यामधून एक प्राणी तिरका तिरका चालत गेला. तो आपल्या बटबटीत डोळ्यांनी मिनूकडे पाहत होता. आता मात्र मिनूची घाबरगुंडी उडाली. पळत जाऊन ती कासवदादाजवळ उभी राहिली.

''घाबरू नकोस, हा तर खेकडा! याच्या पाठीवर माझ्यासारखंच कठीण कवच आहे. त्यामुळे शत्रू याच्यावर हल्ला करू शकत नाही. याला सहा तर कधी आठ पायही असतात. तरीपण बेट्याला सरळ मात्र

चालता येत नाही. तोंडाजवळ दोन नांग्या असतात त्यामुळे त्याचं संरक्षणही होतं व त्याला भक्ष्यही पकडता येतं.

‘‘आता तू माझ्याबरोबर चल, आपण खूप दूर व खूप खूप खोल जाऊ. तिथे खूप अंधार असेल, कारण इतक्या खोलवर प्रकाश पोहोचत नाही. तिथं प्रचंड आकाराचे मासे पोहतात. काही माशांच्या अंगातून उजेड बाहेर पडतो. चल येतेस गंमत बघायला?''

‘‘नको रे बाबा.'' घाबरून मिनू म्हणाली, ‘‘मला माझ्या आईकडे जायचंय.''

कासवदादा हसून तिच्याबरोबर निघाले. वाटेत ठिकठिकाणी जाळी सोडलेली होती. ती चुकवत त्यांनी मिनूला नदीत आणून सोडले!

अहाहा! नदीच्या गोड पाण्याचा स्पर्श मिनूच्या अंगाला झाला. तिने दोन-तीन चुळा भरल्या. खारट तोंड स्वच्छ धुतले गेले.

‘‘कासवदादा, चला ना माझ्याबरोबर.'' तिने आग्रह केला.

‘‘नको मिनू. जसा तुला समुद्र आवडत नाही, तशीच मला नदी आवडत नाही. बरं! येतो मी, तू मात्र आता घरीच जा हं!'' वळून बघत कासवदादा हळूहळू निघाले.

मिनूला क्षणभर वाईट वाटले. कासवदादांनी तिला कितीतरी गमती दाखवल्या होत्या. त्या कधी एकदा आईला सांगेन, असे तिला झाले होते.

**– विनया साठे**

---

**शब्दार्थ : जलप्रवास** – पाण्यातील प्रवास. **मासोळी** – लहान मासा. **मुसळधार** – फार जोराचा. **लोंढे**– खूप लोट. **चक्कर मारून** – भटकून, फिरून. **डोळे विस्फारणे** – डोळे मोठे करणे. **भक्ष्य** – शिकार.

## स्वाध्याय



**प्र. १. एक-दोन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) मिनू मासोळी कुठे राहायची?

(आ) मिनूला समुद्र का बघायचा होता?

(इ) नदीचे पाणी गढूळ का झाले?

(ई) खडकावर फुललेल्या फुलांचे रंग कोणते होते?

(उ) समुद्राच्या खोलवर अंधार का असतो?

**प्र. २. तीन-चार वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) लेखिकेने नदीचे वर्णन कसे केले आहे?

(आ) मिनूची व आईची चुकामूक का झाली?

(इ) घोडमासा पाहून मिनूला हसू का आले?

**प्र. ३. कोण, कोणास व केव्हा म्हणाले ते लिहा.**

(अ) ‘‘समुद्र, समुद्र म्हणतात तो आला की!''

(आ) ‘‘त्याचं नाव घोडमासा, समुद्रघोडा!''

(इ) ‘‘घाबरू नकोस, हा तर खेकडा!''

(ई) ‘‘कासवदादा, चला ना माझ्याबरोबर.''

प्र. ४. शिंपल्यामध्ये मोती कसा तयार होतो? क्रमाने क्रिया लिहा.

प्र. ५. चार-पाच ओळींत वर्णन करा.

(अ) घोडमासा (आ) खेकडा

प्र. ६. 'इवलीशी' यासारखे आणखी शब्द लिहा.

प्र. ७. (अ) समानार्थी शब्दांच्या योग्य जोड्या लावा.

इवली, गरम, दूर, मोठे

लांब, प्रचंड, लहान, उष्ण

(आ) विरुद्धार्थी शब्दांच्या योग्य जोड्या लावा.

टणक, लहान, अंधार, मागे

पुढे, प्रकाश, मोठे, मऊ

प्र. ८. योग्य जोड्या लावा.

| नाम | विशेषण |
|---|---|
| (अ) मिनू | (१) मुसळधार |
| (आ) पाणी | (२) इवलीशी |
| (इ) डोळे | (३) खारट |
| (ई) पाऊस | (४) बटबटीत |

प्र. ९. खालील शब्द वाचा. समजून घ्या.

गदागदा, खालोखाल, पदोपदी, चित्रविचित्र, पटापट, रातोरात, मोठमोठी, पावलोपावली, मागोमाग

प्र. १०. तुम्ही मिनू मासोळी आहात अशी कल्पना करून समुद्राची माहिती आईला सांगा.

प्र. ११. शंख-शिंपल्यांपासून शोभेच्या वस्तू बनवा.

- खालील वाक्ये वाचा.

(अ) विसूने 'ताजमहाल' पाहिला.

(आ) मंदाने सुरेशला सांगितले, 'पायल तुझ्याकडे उद्या येणार आहे.'

एखाद्या शब्दावर जोर द्यावयाचा असता, दुसऱ्याचे मत अप्रत्यक्ष सांगताना (' - ') असे एकेरी अवतरणचिन्ह वापरले जाते.

- खालील वाक्यांतील काळ ओळखा.

(अ) सूर्य पूर्वेला उगवतो.

(आ) मला लाडू आवडला.

(इ) आईचा स्वयंपाक झाला होता.

(ई) मी गावाला जाईन.

(उ) तू का रडतेस?

(ऊ) मी पोहायला शिकणार आहे.

C716G9